१६६

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र. ........
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७
१२६०४
20 SEP 2024
-१/१अ/२/लेखा/अर्थसंकल्प
आस्थापना मु.प्र.अ./उ.सं.न.र./सं.न.र.

**प्रादेशिक योजना, पुणे.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) अन्वये फेरबदल प्रसिध्द करणेबाबत...

- मौ. साते, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं. ४४, ४६, ४८, ४९पै., ५०, २५, ८०६, ८१२, ८१९, ८२०, २६/अ/१ व ८०७ मधील १०.२५३३ हे.आर या जमिनी शेती तथा नाविकास विभागातून वगळून सार्वजनिक-निमसार्वजनिक (PSP) विभागात समाविष्ट करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय.

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे - ४११००१

निर्णय क्र.प्रा.यो.पुणे/मौ.साते/ग.नं. ४४ व इतर/कलम २०(३)/सहसंपुवि/५५७७ दि. १८.०९.२०२४

JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING AND VALUATION DEPTT. PUNE DIVISION

( स. म. पवार )
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

प्रति-

१) मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
२) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे आदेश नगररचना, संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
४) जिल्हाधिकारी, पुणे.
५) अवर सचिव, नगर विकास विभाग, नवि (१३) मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
६) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारगृह, पुणे ४११ ००६.
/- त्यांना विनंती करण्यात येते कि, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग-१, पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पुरविण्यात यावी.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे – ४११ ००१.

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

सूचना क्र.प्रा.यो.पुणे/ मौ.साते/ ग.नं. ४४ व इतर/ कलम २०(३)/ सहसंपुवि/ १५७८

दि. १८.०९.२०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतूदीनुसार पुणे जिल्हयाची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दि. २५.११.१९९७ रोजी मंजूर केली असून, ती दि.१०.०२.१९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौ. साते, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं. ४४, ४६, ४८, ४९पै, ५०, २५, ८०६, ८१२, ८१९, ८२०, २६/अ/१ व ८०७ मधील सलग क्षेत्र १०.२५३३ हे.आर या जमिनी शेती तथा नाविकास विभागातून वगळून सार्वजनिक-निमसार्वजनिक (PSP) विभागात समाविष्ट करणेबाबत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, पुणे तर्फे श्री. विठ्ठल सोमाजी काळभोर यांनी दि. २७.०४.२०२३ रोजी या कार्यालयास विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदला संदर्भाने करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५/ प्र.क्र.४९/ १५/ नवि-१३, दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले

आहेत, (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे), व त्याअनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट कलम (२) मधील तरतूदीनुसार, उक्त जमीनी, 'शेती तथा नाविकास विभागातून' वगळून खालील अटींच्या अधीन राहून, 'सार्वजनिक-निमसार्वजनिक (PSP) विभागात' समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे. (यापुढे ज्यास "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे;

**अटी** -

१. शासन निर्णय दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ तसेच या अनुषंगीक शासन निर्णयातील सर्व अटी/ शर्ती, जमिनधारक/ विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.
२. जिल्हाधिकारी, पुणे, मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रा.वि.पुणे, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रा.वि.पुणे, मुख्य अभियंता जलसंपदा प्रा.वि.पुणे, व सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा या कार्यालयांचे अनुक्रमे दि. ०६.०३.२०२४, दि. ०७.०५.२०२४, दि.२३.१०.२०२३, दि. ०१.०१.२०२४, दि. १३.०९.२०२३ रोजीच्या पत्रातील अटी/ शर्ती जमिनधारक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.
३. कलम २०(४) ची अधिसुचना निर्गमित करणेस समितीची मान्यता मिळाल्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाचे आत अधिमुल्याची रक्कम न भरलेस उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करणे बाबतची कलम २०(४) ची कार्यवाही करणेत येईल.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ पोटकलम (१) अन्वये निरणय क्र. टिपीएस-१८१५/ प्र.क्र. ४९/ १५/ नवि-१३, दि. ११.६.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे कलम २०(२), २०(३) व २०(४) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत;

आणि त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोटकलम (३) अन्वये, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे उक्त प्रादेशिक योजनेत उक्त फेरबदल करण्याचा हेतू या सूचनेव्दारे घोषीत करीत असून उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत ;

हरकती / सूचना **सहायक संचालक, पुणे शाखा, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, बी विंग, पूर्व बाजु, पुणे – ४११ ००१** यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात. उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ त्यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. प्रस्तुत फेरबदलाबाबत विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/ हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर करण्यासाठी सहायक संचालक, पुणे शाखा, पुणे यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रस्तुतसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING AND VALUATION DEPTT. TOWN PLANNING, PUNE ★ PUNE DIVISION ★

(रा.म. पवार)

सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती

तथा

सहसंचालक, नगर रचना,

पुणे विभाग, पुणे

**Government of Maharashtra**

**Urban Development Department**

Office of the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune

212, Second Floor, New Administrative Building, Opp. Council Hall, Pune – 411 001.

## NOTICE

### Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

No. R.P Pune/ Mou. Sate/ Tal. Maval/ G.No.44 & othrs / Section 20(3)/ JDTP/ 1577

Dated : 18.09.2024

Whereas, the Government has sanctioned the Regional Plan for Pune District on 25.11.1997 (hereinafter referred to as " the said Regional Plan") under the provisions of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act") and has came into force with effect from 10.02.1998;

And whereas, Shri. Vitthal Somaji Kalbhor on Behalf of Pimpri Chinchwad Education Trust, Pune has requested to this office Vide letter dated 27.04.2023, to delete the land from 'Agriculture/ No Development Zone' and include in Public Semi-Public (PSP) Zone in the said Regional Plan, admeasuring about **10.2533** ha. of Mou. Sate, Tal. Maval, District. Pune, bearing Gat No. 44, 46, 48, 49 pt., 50, 25, 806, 812, 819, 820, 26/A/1 & 807; (hereinafter referred as "the said land");

And whereas, the Government vide Resolution No. TPS-1815/ C.R. 49/ 15/ UD-13, Dt. 06.05.2015 and Dt. 04.01.2016 (hereinafter referred to as "the said Government Resolution") has issued the directives under section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under section 20 of the said Act, for making changes in use of land in the areas of sanctioned Regional Plans, and for that purpose constituted "Proposal Scrutiny Committee";

And whereas; the "Proposal Scrutiny Committee" constituted under the said Government Resolution, is of the opinion that, the said land shall be deleted from

'Agriculture/ No Development Zone' and proposed to be included in 'Public Semi-Public (PSP) Zone', and accordingly it is necessary to modify the said Regional Plan (hereinafter referred to as " the said modification") in accordance with the provisions of sub-section (2) of section 20 of the said Act, subject to the following conditions:-

**Conditions -**

i) Conditions laid down in the said Government Resolutions dated 06.05.2015, 04.01.2016 and payment of requisite premium and charges shall be binding on the land owner / developer.

ii) Conditions prescribed by the Collector Pune, Chief Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran, Region Pune, Chief Engineer, Public Works, Region Pune, Chief Engineer, Irrigation, Region Pune & Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune in the letters dated 06.03.2024, 07.05.2024, 23.10.2023, 01.01.2024 & 13.09.2023 respectively shall be binding on the landowner / developer.

iii) If the amount of premium is not paid within a period of one year from the date of letter communicating that the permission is granted for issuing notification under section 20 (4) of the said Act, the said modification will be refused to accord sanction under section 20 (4) of the said Act.

And whereas, as per the provision of sub-section (1) of section 151 of the said Act, Government vide notification No.TPS-1815/ CR-49/ 15/ UD-13, dated. 11.06.2015 has delegated the powers under section 20(2), 20(3) & 20(4) of the said Act to the concerned Joint Director of Town Planning.

Now therefore, in exercise of powers delegated by the Government in this regard, as per section 20(3) of the said Act, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune; by this notice, declares intention to make the said modification in the said Regional Plan and for the said modification invites Suggestions / Objections from the public in writing, within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette;

The Suggestions/ Objections shall be addressed to "**Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune, New Administrative Building, 3rd Floor, B-wing, East, Pune – 411 001**". The plan showing the proposed said modification is kept open for inspection to the public during office hours in the office of **Assistant Director of Town Planning, Pune**

**Branch, Pune** who is appointed as the "Officer" to hear the Suggestions/ Objections received within the stipulated period and after following legal procedure to submit the report thereon to Member Secretary.

This Notice is also available on website www.dtp.maharashtra.gov.in.

**(R.M.Pawar)**

Member Secretary,

Proposal Scrutiny Committee and

Joint Director of Town Planning,

Pune Division, Pune.